कृपया आपले स्तरावरून विभागातील क्षेत्रीय अधिका-यांना त्वरीत कळवावे.

कृषि सेवारत्न पुरस्कार
मार्गदर्शक सुचना, सन - २०२०

जा.क्र./कृमावि/वि.प्र.४/मा.सु./ १४५१७ /२०२१
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक - २८ /०४/२०२१

प्रति,

१. कृषि संचालक (सर्व)
२. कृषि सहसंचालक (आस्थापना)
३. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
५. कृषि विकास अधिकारी जिल्हा परीषद (सर्व)

विषय :- कृषि विभागातील सर्व संवर्गातुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, कृषि सेवारत्न पुरस्कार देण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना.....

**संदर्भ :-** शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रं.कृभुपु-२०१२/प्र.क्र.१३४/११अे मंत्रालय, मुंबई-३२ दि.६ सप्टेंबर २०१४

राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील एक अतिउत्कृष्ठ अधिकारी व एक अतिउत्कृष्ठ कर्मचाऱ्यास राज्यशासनाव्दारे प्रतीवर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि सपत्नीक सत्कार असे असुन सदर पुरस्काराचे वितरण राज्य शासनाच्या कृषि विभागाव्दारे वितरित करण्यात येणाऱ्या अन्य कृषि पुरस्कारांचे समवेत करण्यात येईल.या पुरस्काराकरीता ९ (आठ कृषि विभागातून प्रत्येकी ०१-अधिकारी/कर्मचारी याप्रमाणे-८, तसेच कृषि आयुक्तालय स्तरावरून एक अधिकारी/ कर्मचारी याप्रमाणे एकंदर एकूण-९)

१. सदर मार्गदर्शक सूचना जिल्हा व तालुका स्तरावरुन कृषि विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून संबंधितांकडून प्रस्ताव मागविण्यात यावेत.
२. या पुरस्कारासाठी फक्त सेवेत असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची शिफारस करण्यात यावी.
३. शिफारसपात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची कमीत कमी १५वर्षे पूर्ण सेवा झालेली असणे अनिवार्य राहील. सेवेची गणना पुरस्कार पूर्व डिसेंबर महिन्यापर्यंत करावी. (उदा.सन २०२० च्यापुरस्कारासाठी विचार करावयाचा असल्यास डिसेंबर-२०१९ पर्यंतच्या सेवेची गणना करावी.)
४. ज्या वर्षासाठी शिफारस करण्यात येईल त्याच वर्षासाठी प्रस्तावाचा विचार करण्यात यावा.
५. अधिकारी/कर्मचाऱ्याला सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव शिक्षा झालेली असल्यास अथवा त्याच्याविरुध्द विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित असल्यास अथवा तो आधीच्या सेवा कालावधीत निलंबित झालेला असल्यास त्याचा पुरस्कारासाठी विचार करु नये.
६. याबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन खातरजमा करुन तसे हमीपत्रावर विभागीय कृषि सहसंचालक/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी स्वाक्षरी करताना स्पष्टपणे नमूद करावे.

७. आयुक्तालय स्तरावरील प्रस्तावांचे बाबतीत संबंधित संचालकांनी, कृषि सहसंचालक आस्थापना यांचे मार्फत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन खातरजमा करुन तसे हमीपत्रावर स्वाक्षरी करताना स्पष्टपणे नमूद करावे.

८. अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखला झालेला नसावा. तसे त्याच्याकडून हमीपत्र घेण्यात यावे व ते हमीपत्र त्याच्या वरिष्ठांनी सही, शिक्का, दिनांकासह साक्षांकित करावे.

९. विभागीय कृषि सहसंचालक यांनी शिफारसपात्र अधिकारी/ कर्मचाऱ्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव विहीत नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा आणि तिसरी प्रत विभागीय कृषि सहसंचालक यांनी स्थळ प्रत म्हणून जतन करावी.

१०. पुरस्कारासाठी शिफारस करताना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा अनुभव, कृषि विकासात व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर घालण्यामध्ये त्यांनी केलेले विशेष प्रयत्न व उपाय, तसेच वैशिष्टयपूर्ण उपक्रम इत्यादीचा विचार करणे आवश्यक राहील.

११. प्रस्तावाच्या दर्शनी भागावर अधिकारी/कर्मचाऱ्याचे नांव, कार्यालयाचे नांव व कार्यालयाचा पूर्ण पत्ता असावा. प्रस्ताव स्पायरल बायंडिंगमध्येच असणे आवश्यक आहे.

१२. प्रस्ताव तयार करताना प्रत्येक विषयासाठी उपविभाग पाडून त्यानुसार पृष्ठसंख्या निश्चित करावी आणि खाली दिलेल्या अनुक्रमांकानुसारच प्रस्ताव तयार करावा. एकूण पृष्ठ संख्या ५० पेक्षा अधिक झाल्यास अधिकच्या पानां वरील माहितीचे मूल्यमापन केले जाणार नाहीे.

१३. प्रस्ताव सादर करताना संबंधितांचे दोन पासपोर्ट साइज फोटो स्टेपल न करता तसेच फोटोच्या मागे संक्षिप्त नाव व मोबाइल नंबर नमुद करून लिफाप्यामध्ये सादर करावेत.

१४. १४.प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचा प्रतिनियुक्तीच्या कालावधीत या पुरस्कारासाठी विचार करु नये.

१५. विभागीय कृषि सहसंचालक यांना त्यांच्या स्वत:चे प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास, ते कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांच्याकडे सादर करावेत.

१६. विभागीय समितीने प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याच्या कामाचे मुल्यमापन (प्रपत्र ई ) मध्ये करावे. या पुरस्काराकरीता राज्यातील आठ विभागामार्फत प्रत्येकी एक अधिकारी व एक कर्मचारी तसेच आयुक्तालय स्तरावरुन एक अधिकारी व एक कर्मचा-याची शिफारस करण्यात यावी.

१७. सदर मार्गदर्शक सूचना जिल्हा व तालुका स्तरावरुन कृषि विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांचे निदर्शनास आणून संबंधितांकडून प्रस्ताव मागविण्यात यावेत.

१८. विभागीय समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांचे स्पष्ट अभिप्राय आणि शिफारशीसह प्रस्ताव आणि बैठकीचे इतिवृत्त समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरी, नांवे व हुद्यासह सादर करावेत. विभागीय समितीच्या शिफारशीशिवाय आलेले थेट प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत.

१९. कृषि आयुक्तालयातील अधिकारी/ कर्मचारी यांचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे परिपुर्ण प्रस्ताव संबंधित संचालकांमार्फत शिफारस करुन कृषि माहिती विभागाकडे पाठवावेत.

२०. लोकप्रतिनिधींनी पुरस्कारासाठी शिफारस केल्यास असे प्रस्ताव अपात्र समजण्यात येतील.

२१. शिफारशीसाठी प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी कार्यालयातील वर्ग-१ चे अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावी प्रस्तावातील माहिती/फोटो खोटी अथवा फसवी असल्याचे तसेच प्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आल्यास संबंधित कृषि सहसंचालकांना जबाबदार धरण्यात येईल.

**सर्वोत्तम अधिकारी व कर्मचारी यांची पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कारासाठी निवड करण्याकरीता त्यांनी केलेल्या कृषि विभागातील विविध सेवांच्या सर्वोत्तम कार्याचे निकष-**

**अ) विस्तार कार्यक्रम**

१. कृषि विस्तार कार्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना मिळालेला फायदा व या कार्याचे राज्यभर अनुकरण करण्याकरिता मिळालेली दिशा.

२. शेतकऱ्यांना झालेला फायदा शेतकऱ्यांचे अनुभव, अनुकरणप्रक्रियेत दिसून आलेली वाढ व त्यांची अंमलबजावणी केलेल्या सर्वोत्तम कार्याची, गाव, तालुका, जिल्हा इ. सह सविस्तर माहिती

**ब) मृद संधारण**

मागील १५ वर्षात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात केलेल्या कामापैकी केवळ सर्वोत्तम कामाचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे देण्यात यावा.

१. पाणलोट क्षेत्रातील कामे :- उल्लेखनिय कामाचा तपशील - यामध्ये पाणलोटाचे नांव, गाव, तालुका, जिल्हा याचा उल्लेख असावा.

अ. पाण्याच्या पातळीत झालेली वाढ

ब. सिंचन क्षेत्रात झालेली वाढ

क. पाणलोटाचे कामामुळे पीक पध्दतीत झालेला बदल

ड. शेतीपुरक व्यवसायात झालेली वाढ

२. लोकसहभागासाठी केलेले विशेष प्रयत्न

३. मृदसंधारणाचे कामामध्ये लोकसहभागासाठी इतरांना मार्गदर्शक ठरतील असे केलेले विशेष प्रयत्न.

**क) फलोत्पादन**

१. फलोत्पादन विकासासाठी लागवड, उत्पादन, प्रक्रिया व विक्री यापैकी केलेल्या प्रयत्नामुळे या क्षेत्रातील योगदानाचे महत्व.

२. उत्पादन, गुणवत्ता व मुल्यवृध्दी याकरीता केलेले विशेष प्रयत्न, त्याचा शेतकऱ्यांना झालेला फायदा याबाबत शेतकऱ्यांचे अनुभव व या अनुभवाचे इतर शेतकऱ्यांनी केलेले अनुकरण, केलेल्या सर्वोत्तम कार्याची, गांव, तालुका, जिल्हा इ. सह सविस्तर माहिती.

**ड) गुणवत्ता नियंत्रण**

गुणवत्ता नियंत्रणाव्दारे केलेले विशेष प्रयत्न ज्यातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना कृषि निविष्ठांच्या उपलब्धतेत सुलभता आली आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध होऊ शकल्या.

**इ) प्रशासकीय**

प्रशासकीय स्वरुपाचे कामामुळे कृषि विभागातील प्रशासनास दिशादर्शक व अनुकरणीय झालेले कामाचा सविस्तर तपशील

**ई) इतर महत्वपूर्ण कार्य**

१.अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी नवीन प्रयोग हाती घेतला आहे का असल्यास त्याबाबत थोडक्यात माहिती.

२.दुर्बल / अतिदुर्बल शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कोणते विशेष प्रयत्न आहेत दुष्काळामुळे, सततच्या नापिकीमुळे व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत होणारी वाढ रोखण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न व त्याचे दृष्य परिणाम

३.अधिकारी/कर्मचारी यांनी नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त अन्य कार्यक्रम स्वयंप्रेरणेने आयोजित केले असल्यास उपक्रमाचा तपशील.

४.अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत: कृषि विषयक उपयुक्त व शेतकरीभिमुख साहित्य,पुस्तके,लेख लिहिले असल्यास तपशील.

५.अधिकारी/कर्मचारी यांना गेल्या दहा वर्षामध्ये कृषि विभाग, जिल्हा परिषद, अन्य यंत्रणा, सामाजिक संस्थाकिंवा शासनाकडून काही पुरस्कार मिळालेले असल्यास सविस्तर तपशील.

६.अधिकारी कर्मचारी यांच्या सेवा वर उल्लेख केलेल्या तांत्रिक स्वरुपाच्या कामाच्या नसतील परंतु त्यांनी केलेली सेवा कृषि विभागास दिशा देणारी असेल अशा अधिकारी/कर्मचाऱ्याचे सुध्दा प्रस्ताव त्यांनी केलेल्या वैशिष्टपूर्ण कार्यासह विचारात घ्यावेत.

**विभागीय स्तर समितीने प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे**

| अ.क्र. | विषयाचा तपशील |
|---|---|
| १. | विहित नमुन्यातील प्रस्ताव |
| २. | विभागीय स्तर समितीच्या बैठकीचे इतिवृत्त |
| ३. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दिलेले वर्तणुक प्रमाणपत्र ( सोबतच्या विहित नमुन्यात द्यावे.) |
| ४. | पोलीस तक्रार नसल्याचे जि.अ.कृ.अ.यांच्या प्रतिस्वाक्षरीसह प्रमाणपत्र |
| ५. | रंगीत फोटो (मागील बाजूस नांव असलेले व साक्षांकित केलेले) |

**विभागीय स्तर समितीची रचना**

विभागीय स्तरावरील प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन प्रस्ताव कृषि आयुक्तालय स्तरावर सादर करण्यासाठीची खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सहसंचालक | अध्यक्ष |
| २. | विभागातील सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | विभागीय कृषि सह संचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**कृषि आयुक्तालय स्तरावरील छाननी समितीची रचना**

कृषि आयुक्तालय स्तरावरील प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी खालील प्रमाणे समिती राहील. ही समिती प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय नोंदवून त्यापैकी पाच प्रस्ताव शिफारशीसह उच्चस्तरीय राज्य निवड समितीस सादर करेल.

| | |
|---|---|
| १.आयुक्त कृषि | अध्यक्ष |
| २.संचालक फलोत्पादन | सदस्य |
| ३.संचालक मृदसंधारण | सदस्य |
| ४.संचालक (गुणवत्ता व नियंत्रण) | सदस्य |
| ५.संचालक (प्रक्रिया व नियोजन) | सदस्य |
| ६.संचालक (विस्तार व प्रशिक्षण) | सदस्य |
| ७.संचालक (आत्मा) | सदस्य |
| ८.कृषि सहसंचालक ( वि.प्र.२) | सदस्य सचिव |

**उच्चस्तरीय राज्य निवड समितीची रचना**

खालील प्रमाणे उच्चस्तरीय राज्य निवड समितीव्दारे राज्यस्तरीय पुरस्काराकरिता एका पुरस्कार्थींचे नांव अंतिम करण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. मा. मंत्री (कृषि) | अध्यक्ष |
| २. मा. राज्यमंत्री (कृषि) | सदस्य |
| ३. मा. अपर मुख्य सचिव (कृषि) | सदस्य |
| ४. मा. आयुक्त (कृषि) | सदस्य |
| ५. उपसचिव (कृषि) | सदस्य |

**विविध कृषि पुरस्कारांकरीता खालीलप्रमाणे वेळापत्रक विहित करण्यात येत आहे.:-**

- ❖ जिल्हा स्तरावर दरवर्षी **३१ जुलै पर्यंत** अधिनस्त तालुक्यांकडून प्रस्ताव प्राप्त करून घ्यावेत.
- ❖ जिल्हा स्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन, अनुषंगीक बाबींची पुर्ततेची कार्यवाही करुन घेउन प्रस्ताव **३१ ऑगस्ट पर्यंत** विभाग स्तरीय समितीकडे सादर करणे.
- ❖ विभागस्तरीय समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन, उल्लेखनिय कार्याबाबतच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारस केलेले परिपुर्ण व निकषाप्रमाणे पात्र प्रस्ताव विभागस्तरीय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तासह कृषि आयुक्तालयास खास दुतामार्फत एकत्रितपणे **३० सप्टेंबर** पर्यंत सादर करणे.
- ❖ कृषि आयुक्तालयस्तर समितीने विभागस्तर समितीकडून शिफारशीसह प्राप्त झालेल्या पात्र प्रस्तावांची छाननी करुन **३० नोव्हेंबर पर्यंत** शिफारशीसह अंतिम निवडीसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करणे.

(विकास पाटील)
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण )**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत:-** १. मा.सचिव कृषि,कृषि व पदुमविभाग मंत्रालय,मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. कृषि उपसंचालक,आयुक्त, कृषि कक्ष यांना माहितीस्तव.

३. कृषि उपसंचालक (शेतकरी मासिक) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ शेतकरी मासिका मध्ये योग्य वेळी प्रसिध्दी द्यावी.

## प्रपत्र - अ

## प्रस्तावातील मुद्देनिहाय क्रम

| अ.क्र. | विषयाचा तपशील | प्रष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | अनुक्रमांणिका | |
| २ | अधिकारी/कर्मचारी यांची माहिती (प्रपत्र ब ते ई) | |
| ३ | अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कृषि विकासासाठी केलेले प्रयत्न | |
| ४ | अधिकारी / कर्मचारी यांचा शेतीविषयक कार्यातील सहभाग | |
| ५ | कृषि साहित्य, प्रकाशित लेख किंवा इतर साहित्य | |
| ६ | अधिकारी / कर्मचारी यांचा स्थानिक शेतकऱ्यांमधील लौकिक | |
| ७ | अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्याचे निवडक फोटो (फोटोखाली कोणत्या कार्यक्रमाशी संबंधित आहे ते लिहावे. फोटोच्या झेरॉक्स प्रती जोडू नयेत.) | |

## प्रपत्र - ब
## अधिकारी / कर्मचारी तपशील

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | नांव - श्री./श्रीमती. | |
| २. | पदनाम | |
| ३. | सध्याचे कार्यालयाचा पूर्ण पत्ता (पिनकोडसह) | |
| ४. | राहण्याचा पूर्ण पत्ता (पिनकोडसह) दूरध्वनी क्रमांक | |
| ५. | जन्म तारीख | |
| ६. | शासकीय सेवेत रुजू झाल्याची तारीख | |
| ७. | सेवातनवृत्तीचा दिनांक | |
| ८. | एकूण सेवा | |

## प्रपत्र - क
## शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण परीक्षा | प्राप्त अर्हता (मुख्य विषयासह) | मंडळ/ विद्यापीठ | वर्ष | शेकडा गुणश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | माध्यमिक शालांत परिक्षा | | | | |
| २. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा | | | | |
| ३. | कृषि पदवी/पदविकास वा अन्य शाखेतील पदवी | | | | |
| ४. | कृषि पदव्युत्तर पदवी - अन्य शाखेतील पदवी | | | | |
| ५. | संगणक प्रशिक्षण वर्ग किंवा एम.एस. सी.आय.टी. | | | | |
| ६. | इतर अर्हता | | | | |

## प्रपत्र - ड

## सेवा अभिलेख

## (वेगवेगळया कार्यालयात केलेली दिनांक निहाय सेवा)

| कार्यालयाची क्रमवार नांवे | पद | दिनांक निहाय सेवा कालावधी | पार पाडलेली इतर जबाबदारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

## प्रपत्र – इ

## एकूण अनुभव

| कार्यालयाची क्रमवार नांवे | पासून (दिनांकासह) | पर्यंत (दिनांकासह) |
|---|---|---|
| क्षेत्रिय कामाचा अनुभव | | |
| प्रशासकीय कामाचा अनुभव | | |
| नाविन्यपूर्ण बाबींचे अनुभव | | |
| एकुण | वर्ष | महिने |